SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/ ८२६ दि. १५/१०/२०२६

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
२. मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,सर्व अधिविभाग,
३. सर्व संविधानिक अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४. सर्व विद्यार्थी संघटक
५. सर्व प्राचार्य संघटना
६. सर्व शिक्षक संघटना
७. सर्व कर्मचारी संघटना
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :— विद्यार्थी परिषद निवडणुका घेण्याबाबत नियुक्त तज्ञ समितीमधील तज्ञ सदस्य यांचेसमवेत संवाद साधण्यासाठी आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांसदर्भातील अभ्यास व सल्लामसलत करण्याकरिता महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि २६ ऑक्टोबर, २०१८ च्या एकरुप परिनियमांनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांच्या अनुषंगाने अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ. सुहास पेडणेकर, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे अध्यतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. सदर नियुक्त तज्ञ समितीव्दारा सर्व सार्वजनिक विद्यापीठांमधील विद्यार्थी व विविध घटकांशी संवाद साधण्यात येत आहे.

या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व अधिविभाागातील विद्यार्थी, विद्यार्थी संघटक, शिक्षक संघटना, प्राचार्य संघटना, कर्मचारी संघटना आणि इतर सर्व घटक यांचेशी प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे हे समिती सदस्य शुक्रवार दि. १६/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संवाद साधणार आहेत. तरी आपण सर्व संबधित घटकांनी सदर संवाद कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित रहावे ही विनंती.

तसेच शिवाजी विद्यापीठातील सर्व संविधानिक अधिकारी यांनी संवाद कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भातील अभ्यास व सल्लामसलत करण्याकरिता तज्ज्ञ समिती गठित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २०२६/ ई- १७६००८७/वि.शि.५**

**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**

दिनांक - २४ सप्टेंबर, २०२६

**वाचा:**

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

२. शासन राजपत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रसिद्ध झालेले एकरूप परिनियम (Uniform Statutes No. ५, ६, ७ and ८ of २०१८).

३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/विशि-१/टे.क्र.४० ई- १९५४२९, दि. २३ सप्टेंबर २०२६.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांमध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना आणि निवडणुका घेण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने शासनाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी एकरूप परिनियम (Uniform Statutes) प्रसिद्ध केले आहेत. ज्यामध्ये विद्यार्थी परिषदेची कार्ये व कर्तव्ये, बैठकीचे कामकाज, नामनिर्देशन, निवडणुका घेण्याची कार्यपद्धती, आचारसंहिता आणि तक्रार निवारण यंत्रणा यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

सदर परिनियमांच्या अंमलबजावणीतील आव्हाने, विविध घटकांशी सल्लामसलत करणे, विद्यार्थी परिषद निवडणुका पूर्णतः शैक्षणिक, निकोप व विद्यार्थीकेंद्रित वातावरणात पार पाडण्यासाठी आणि पुढील दिशा निश्चित करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठित करण्याचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी शासनास सादर केला आहे. त्यानुसार तज्ज्ञ समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ च्या एकरूप परिनियमांनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांच्या अनुषंगाने अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे तज्ज्ञ सदस्यांची समिती गठित करण्यात येत आहे:-

समितीची रचना:

१) **डॉ. सुहास पेडणेकर**, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - **अध्यक्ष**

२) **डॉ. पंडित विद्यासागर**, माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - **सदस्य**

३) **डॉ. एन. एस. उमराणी**, माजी प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - **सदस्य**

४) **डॉ. अजय भामरे**, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - **सदस्य**

५) **डॉ. प्रभाकर देसाई**, अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - **सदस्य**

६) **डॉ. प्रशांत अमृतकर**, कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर - **सदस्य**

७) **डॉ. संजय खरात**, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे - **सदस्य**

८) **डॉ. अविनाश मोहरील**, प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे - **सदस्य**

९) **प्रा. डॉ. प्रशांत साठे**, बी.एम.सी.सी. महाविद्यालय, पुणे - **सदस्य**

१०) **प्रा. डॉ. धोंडीराम पवार**, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे - **सदस्य**

११) **डॉ. परवीन सय्यद**, से. नि. वरिष्ठ कायदा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - **सदस्य**

१२) **डॉ. प्रसाद कारंडे**, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - **सदस्य सचिव**

२. समितीची कार्यकक्षा

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि त्या अंतर्गत घोषित झालेले एकरूप परिनियम, दिनांक २६/१०/२०१८ मधील विद्यार्थी निवडणुकांसंदर्भातील तरतुदींचा सखोल अभ्यास करणे.

२) निवडणूक प्रक्रिया, आचारसंहिता आणि तक्रार निवारण यंत्रणा शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी उचित मार्गदर्शक सूचना करणे.

३) विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भात संबंधित घटकांशी सल्लामसलत करून योग्य ती नियमावली आणि पुढील दिशा निश्चित करणे.

४) समितीने आपले निष्कर्ष व अहवाल एका महिन्यात शासनास सादर करणे.

५) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या संबंधित कलमांनुसार विद्यार्थी परिषदेमध्ये विविध घटकांना (विशेषतः: महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, तसेच राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), क्रीडा व सांस्कृतिक विभाग) योग्य व प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व मिळण्याची खात्री करण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करणे.

६) विद्यार्थी परिषद निवडणुकांमध्ये कोणत्याही स्वरूपाचा बाह्य राजकीय हस्तक्षेप अथवा निवडणुकांचे व्यापारीकरण (Commercialization) होऊ नये, तसेच संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्णतः शैक्षणिक, निकोप व विद्यार्थीकेंद्रित वातावरणात पार पाडावी, यासाठी कडक नियमावली आणि उपाययोजना सुचवणे.

७) शासनाच्या एकरूप परिनियमांमधील (Uniform Statutes) तरतुदीनुसार विद्यार्थी परिषदेचा निधी, अंदाजपत्रक (Budget) आणि खर्चाचे व्यवस्थापन तसेच त्याचे विहित वेळेत लेखापरीक्षण (Audit) पारदर्शकपणे होण्यासाठी सुस्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे.

८) नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना त्यांची कार्ये, कर्तव्ये, अधिकार आणि विद्यापीठ अथवा महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीची योग्य माहिती देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व प्रबोधन कार्यक्रमांची (Orientation and Training Programs) रूपरेषा निश्चित करणे.

९) निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्यासाठी नामनिर्देशन (Nomination), छाननी (Scrutiny), मतदान आणि तक्रार निवारण प्रक्रियेमध्ये शक्यतेनुसार डिजिटल किंवा ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्याबाबत पडताळणी करून अहवाल देणे.

३. **इतर बाबी:**

१) सदरहू समितीच्या बैठका मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे ऑनलाईन/ऑफलाईन/प्रत्यक्ष उपस्थित पद्धतीने आयोजित करण्यात याव्यात. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे समितीचे सदस्य सचिव या नात्याने सर्व समिती सदस्यांशी संपर्क करून बैठका आयोजित करण्याची कार्यवाही करावी.

२) मुंबई विद्यापीठाने समितीमधील अशासकीय सदस्यांचे मानधन व प्रवासभत्ता विद्यापीठ निधीतून विद्यापीठ नियमानुसार परस्पर संबंधित समिती सदस्यांना अदा करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२४१८३०३७५३०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP
PANDURANG LUBAL

**( प्रताप पां. लुबाळ )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन,**

**प्रति :**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व सह सचिव / उप सचिव , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.